भूमिहीन हक्क संरक्षण समिती
~~पुणे संपर्क~~ : डॉ० अजित सरदार
राष्ट्री चेंबर्स, १० सदाशिव पेठ
पुणे ३०     दि.

धुळे जिल्ह्यामधील शिरपूर तालुक्यात पोलीस-एस.आर.पी.च्या मदतीने वनअधिकाऱ्यांनी सुरू केलेले अमानुष अत्याचारसत्र आदिवासींचे जीवन मुळातूनच नष्ट करीत आहे. डिसेंबर व जानेवारी या गेल्या दोन महिन्यातच एका शिरपूर तालुक्यात लहानमोठी दीडशे गावे उध्वस्त करण्यात आली. संगिनींचा धाक दाखवून रात्री-अपरात्री आदिवासींना धमक्या देण्यात आल्या. त्यांचे धान्य, भांडीकुंडी, कापूस व इतर वस्तू जप्त करून त्यांचा लिलाव करण्यात आला. प्रत्येक कुटुंबाकडून दमदाटी करून दोनशे रुपये वसूल करण्यात आले. दारिद्र्याने पिचलेल्या आणि दुष्काळामुळे कंगाल झालेल्या आदिवासींना त्यांची घरेदारे ही उजाड करून देशोधडीस लावले गेले.

हे सर्व अतिक्रमणे हटवून वनविकास करण्यासाठी, पर्यावरणवादाचा बुरखा घेऊन केले गेले, महाराष्ट्र शासनाचा किंवा न्यायालयाचा कोणताही हुकूम नसताना ही कारवाई झाली. उलट धुळ्याच्या न्यायालयाने ही अमानुष बेकायदेशीर कारवाई थांबविण्याचे आदेश देऊनही ती चालूच राहिली. आदिवासींच्या या उध्वस्तीकरणाला ज्यांनी विरोध केला त्यांना जिल्हाधिकाऱ्यांकडून दम भरण्यात येत आहे. त्यांच्यावर आदिवासींना भडकविण्याचा आरोप केला जात आहे.

महाराष्ट्र सरकारच्या १९७८-७९ सालच्या, अतिक्रमित जमिनींबाबतच्या आदेशांची (जी.आर.) अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी केलेली नाही. त्यामुळे वनजमिनी रीतसर कायम हक्काने आदिवासींना मिळालेल्या नाहीत. जी गावे उखडली गेले तेथे हे आदिवासी चाळीसाहून अधिक वर्षे राहात आहेत. त्या गावांमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळा, पिण्याच्या पाण्यासाठी हातपंप आहेत. घरपट्टी व इतर कर नियमितपणे वसूल केले जात आहेत. दारिद्र्य रेषेखालची कार्डे व रेशनकार्डे आहेत. वीज व दूरध्वनीची व्यवस्था आहे. अशी गावेही अतिक्रमणे ठरवून ती नष्ट करण्याची मनमानी कारवाई ही मूलभूत मानवी अधिकारांवरच घाला घालणारी आहे.

धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. रोहिदास पाटील यांनी चिंचपाणी इ. उध्वस्त गावांना भेटी देऊन खेद व्यक्त केला. परंतु केंद्र सरकारच्या १९८० च्या वनविधेयकाकडे बोट दाखवून महाराष्ट्राचे कॉंग्रेस सरकार अतिशय लाचार भूमिका घेत आहे. भूमिहीन हक्क

दि. २०७।८८ रोजी

संरक्षण समितीचे शिष्टमंडळ वनमंत्री ना. मेघे यांना भेटले. तेव्हा एस.आर.पी. व वनाधिकाऱ्यांनी चालवलेले हे क्रूर सत्र ताबडतोब थांबवा असे तोंडी आदेश त्यांनी शिष्टमंडळासमोरच दिले. तरीही २१ जानेवारीला एस.आर.पी. घेऊन वनअधिकारी चिंचपाणीतून उठवलेल्या आदिवासींचे सामान जप्त करण्यासाठी गेले. त्यामुळे आदिवासींनी कडवा प्रतिकार केला. वन-अधिकाऱ्यांच्या गुर्मीतून व आततायीपणामुळे चिंचपाणीची घटना घडली.

तसेच या कारवाईच्या समर्थनार्थ, 'मध्यप्रदेशातून आलेल्या आदिवासींना हाकलण्याचे काम आपण करत आहोत' असा युक्तिवाद धुळ्यातील अधिकारी करत आहेत. प्रत्यक्ष पाहणीत, अलीकडच्या काळात मध्यप्रदेशातून आलेली सुमारे शंभर कुटुंबे फक्त आढळली. तरीही त्यांना हाकलण्याचे अधिकार वनाधिकाऱ्यांना कोणी दिले? महाराष्ट्र व मध्यप्रदेश असा वाद निर्माण करून केलेली ही कारवाई राष्ट्रीय एकात्मतेला बाधक तर आहेच, पण भारताच्या राज्यघटनेने १९ व्या कलमान्वये दिलेल्या (भारतात कोठेही संचार करण्याच्या व स्थायिक होण्याच्या) मूलभूत हक्कावर गदा आणणारी आहे.

या अमानुष मनमानी कारवाईचा आम्ही धिक्कार करतो व खालील मागण्या करतो:

१. आदिवासींची गावे उध्वस्त करण्याची क्रूर, बेकायदा कारवाई ताबडतोब थांबवण्याचे स्पष्ट लेखी आदेश शासनाने त्वरित द्यावेत.

२. १९७८-७९ च्या आदेशांची विनाविलंब अंमलबजावणी करून जमिनी आदिवासींच्या नावाने करून द्याव्या.

३. पूर्वीच्याच जागांवर आदिवासींचे पुनर्वसन करून त्यांना नुकसान-भरपाई द्यावी.

४. महाराष्ट्र विधानसभेने आमदारांची समिती नेमून तिच्यामार्फत संपूर्ण चौकशी करावी. दोषी ठरणाऱ्या अधिकाऱ्यांना शासनाने कडक शिक्षा करावी.

अशोक मनोहर — सर्वश्रमिक संघटना, पुणे

मधुकर पानसरे — अध्यक्ष - भारतीय रिपब्लिकन पक्ष, पुणे — M Pansare

रा. प. नेने — कार्यवाह, लोक स्वतंत्रता संघटना, पुणे — रा प नेने

मुकुंद कोल्हटकर — अध्यक्ष, शेतकरी शेतमजूर पंचायत (महाराष्ट्र)

ॲड. मोहन वाडेकर — सेक्रेटरी, युवा जनता

प्रा० प्रभाकर मानकर — CPM

बाबा आढाव — कार्याध्यक्ष म० जोतीराव फुले समता प्रतिष्ठान.

अजित सरदार — युवक क्रांती दल, महाराष्ट्र